# सुधर्मा

६

## शेतकरी संस्थेच्या कायदेशीरबाबींची पूर्तता




BAIF

apmas


संचालक मंडळाची
सभा

६

# सुधर्मा

## शेतकरी संस्थेच्या कायदेशीरबाबींची पूर्तता

शेतकरी संस्थेच्या संचालकांसाठी
अभ्यास पुस्तिका संच





# सुधर्मा

## शेतकरी संस्थेच्या कायदेशीरबाबींची पूर्तता

**प्रथम आवृत्ती – मे २०२१**

**किंमत – रु.१००/–**

**पुनर्मुद्रणाचे हक्क राखीव आहेत.**

एपीएमएएसच्या परवानगीने आणि एपीएमएएस आणि डीजीआरव्ही लोगो वापरुन सामग्री पुन्हा मुद्रित केली जाऊ शकते.

पुस्तकांच्या मागणीसाठी आपण एपीएमएएस आणि बाएफच्या कार्यालयात फोन किंवा मेलद्वारे संपर्क साधू शकता.

**द्वाराप्रकाशित**

**महिला अभिवृद्धी सोसायटी (एपीएमएएस)**

प्लॉट क्र. ११ आणि १२, हुडा कॉलनी, तानेशानगर, माणिकोंडा

हैदराबाद – ५०००८९, तेलंगणा, भारत

कार्यालय – ०८४१३–४०३११८ / ०८४१३–४०३१२०

ई–मेल – info@apmas.org वेबसाईट – www.apmas.org

आणि

**बाएफ विकास अनुसंधान प्रतिष्ठान**

डॉ मणिभाई देसाई नगर, वारजे,

पुणे ४११०५८, महाराष्ट्र, भारत

कार्यालय – ०२०–२५२३१६६१

ई–मेल – baif@baif.org.in वेबसाईट – www.baif.org.in

# शेतकरी संस्थेच्या संचालक मंडळासाठी स्वयंशिक्षण पुस्तिका संच कशासाठी?

भारतीय शेतकरी अनेक आव्हानांना तोंड देत असले, तरी गेल्या दशकात कृषी क्षेत्राला महत्वपूर्ण गती मिळाली आहे. शेतकऱ्यांना संघटित करणारी शेतकरी संस्था (एफपीओ), ही धोरणकर्त्यांनी आणि अभ्यासकांनी, शेतकरी समृद्धीसाठी सगळ्यात जास्त प्राधान्य दिलेली संस्थात्मक रचना म्हणून उदयास आली आहे. 'शेतकरी संस्था' हे पुढील पाच वर्षांत भारतातील शेतकऱ्यांच्या उत्पन्नात दुप्पट करणारे अत्यंत महत्वाचा घटक ठरणारे धोरण आहे. भारतातील विविध संस्थांद्वारे जवळपास ५००० शेतकरी संस्थांना पाठबळ देण्यात आले आहे आणि बऱ्याच नवीन शेतकरी संस्था स्थापन केल्या जात आहेत. तेलगू भाषिक आंध्र प्रदेश आणि तेलंगणा राज्यात सुमारे ७०० शेतकरी संस्था आहेत. 'शेतकरी संस्था' चळवळ अजूनही प्राथमिक टप्प्यावर आहे, ज्यामध्ये शेतकरी संस्था संचालक मंडळ त्यांच्या प्रवर्तकांवर अवलंबून असते. संचालक मंडळाची स्वतःची दूरदृष्टी, व्यवसायाभिमुखता आणि क्षमता, मर्यादित असते कारण त्यांना दिले जाणारे प्रशिक्षण मर्यादित आहे. शेतकरी संस्थेसमोर बरीच आव्हाने आहेत जसे की, चांगल्या प्रशिक्षित आणि वचनबद्ध मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांचा अभाव, सुशासन, व्यवसायाचे व्यवस्थापन, प्रभावी व्यवस्था, वित्त आणि बाजारपेठेतील प्रवेश या घटकांची आव्हाने, तर सरकारी योजनांविषयीची अपुरी माहिती यासारख्या अनेक गोष्टींनाही सामोरे जावे लागत आहे. कृषी मूल्य साखळी विकासावर लक्षणीय रितीने प्रभाव पाडण्याची क्षमता शेतकरी संस्थासाठी फारच दूरची बाब आहे.

शेतकरी संस्थेच्या संचालक मंडळाची पात्रता आणि क्षमता वाढवणे हे शेतकरी संस्थेच्या यशासाठी अत्यंत, गरजेचे आहे ज्यायोगे शेतीपासून नफा वाढविण्यासाठी तसेच सदस्य शेतकऱ्यांना आवश्यक असणारी सेवा देणारी व्यावसायिक संस्था म्हणून त्या विकसित होऊ शकतील. शेतकरी संस्था अध्यापन केंद्राच्या माध्यमातून शेतकरी संस्थेच्या संचालक मंडळाला सतत प्रशिक्षण व मार्गदर्शन देणे, एपीएमएएससाठी प्राधान्याची गोष्ट आहे, कारण आपण मोठ्या प्रमाणात शेतकरी संस्थांना पाठबळ देण्याचा प्रयत्न करीत आहोत आणि इतरांनी पाठबळ देवू केलेल्या शेतकरी संस्थांना मार्गदर्शन देत आहोत, ज्यायोगे योग्य कृषी मूल्य साखळी विकास उपक्रमांमध्ये त्या उपयुक्त ठरतील.

शेतकरी संस्थेवरील विद्यमान प्रशिक्षण पुस्तिका आणि अभ्यास संचांचा आढावा घेतल्यास, आम्हाला शेतकरी संस्था संचालक मंडळासाठी उच्च गुणवत्तेचे, व्यावहारिक आणि वापरासाठी सोपी स्वयंशिक्षण अभ्यास पुस्तिका नसण्याची मोठी उणीव आढळली. स्वयंसहायता संस्थांच्या स्वयंनियमन विषयावरील स्वयंशिक्षण अभ्यास पुस्तिका संच विकसित करण्याच्या आपल्या प्रचंड अनुभवावर आणि संस्था बांधकाम प्रशिक्षणातील १८ वर्षांच्या अनुभवाच्या आधारे श्री मधू मूर्ती आणि श्रीमती रामलक्ष्मी यांच्या नेतृत्वाखाली एपीएमएएस संघाच्या सहकार्याने एक वर्षाहून अधिक काळ काम करून, संसाधन संस्था, भागीदार

स्वयंसेवी संस्था, प्रशिक्षण संस्था आणि शेतकरी संस्थेचे प्रतिनिधी यांच्या साहाय्याने शेतकरी संस्थेच्या संचालक मंडळासाठी १२ सुलभ वापर स्वयंअभ्यास पुस्तिका संच विकसित केला आहे. या संचामध्ये शेतकरी संस्थेची आवश्यकता आणि महत्त्व, संस्थात्मक रचना, सभासदत्व, नेतृत्व आणि शासन, व्यवस्थापन, नोंदणी आणि कायदेशीर अनुपालन, व्यवसाय नियोजन, उत्पादकता वर्धन, सामूहिक खरेदी विक्री (निविष्ठा आणि उत्पादन), शेती विषयक सेवा केंद्रांचे व्यवस्थापन, लेखा आणि वित्तीय व्यवस्थापन इत्यादींचा अंतर्भाव आहे.

शेतकरी संस्था ह्या नेहमीच लोकशाही पद्धतीने चालणाऱ्या स्वायत्त व्यावसायिक संस्था असतात. शेतकरी संस्थेच्या संचालक मंडळाची आणि पदाधिकाऱ्यांची क्षमता वाढवण्याची सतत आवश्यकता असते कारण नियमित निवडणुकीमुळे त्याच्यात बदल होत असतो. आम्हाला खात्री आहे की हे वापरण्यास सुलभ असे स्वयंशिक्षण अभ्यास पुस्तिका संच शेतकरी संस्थांना त्यांच्या सदस्यांसाठी व्यवहार्य संस्था बनविण्यासाठी सक्षम करतील. स्वयंशिक्षण अभ्यास पुस्तिका संच शिकण्यासाठी शेतकरी संस्थेच्या प्रवर्तकांना पद्धतशीरपणे शेतकरी संस्थेच्या संचालक मंडळाचे प्रशिक्षण घ्यावे लागेल. शेतकरी संस्थेचे प्रवर्तक आणि इतर भागधारक यांच्यासाठीही शेतकरी संस्थेच्या संचालक मंडळाच्या स्वयंशिक्षण अभ्यास पुस्तिका संचाचा प्रभावीपणे वापर करता येईल ज्यायोगे शेतकरी संस्थेच्या स्वयं–व्यवस्थापित आणि व्यवहार्य व्यवसाय संस्था होण्यासाठी सक्षम बनतील. एपीएमएएसने तेलगू आणि इंग्रजीमध्ये या स्वयंशिक्षण अभ्यास पुस्तिका संच तयार करण्याची जबाबदारी स्वीकारली आहे, परंतु आवश्यकतेप्रमाणे या स्वयंशिक्षण अभ्यास पुस्तिका संचांचे संसाधन संस्था, राज्य सरकारे, नाबार्ड आणि प्रशिक्षण संस्था योग्य प्रकारे इतर भारतीय भाषांमध्ये रुपांतर करू शकतात. एपीएमएएस अशा प्रयत्नांना नक्कीच पाठिंबा देईल. ह्या पुस्तिकांचे मराठी भाषांतर करण्यासाठी बाएफ संस्था, पुणे आणि श्री. शिरीष जोशी, श्री. गिरीश जोशी, पुणे यांनी केलेल्या अथक प्रयत्नांबद्दल मनपूर्वक आभार! आपल्या अभिप्रायासाठी आम्ही खूप उत्सुक आहोत.

आपला

**सी. एस. रेड्डी**

मुख्य कार्यकारी अधिकारी

एपीएमएएस

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| शेतकरी संस्थेच्या संचालक मंडळासाठी स्वयंशिक्षण पुस्तिका संच कशासाठी? | | ३ |
| ह्या पुस्तिकेसंबंधी | | ६ |
| सुरुवात करण्यापूर्वी | | १२ |
| १. | कायदेशीर अंमलबजावणी– गरज आणि लाभ | १३ |
| २. | नोंदणी कायद्यान्वये कायदेशीरबाबींचे अनुपालन | १६ |
| ३. | कायदेशीर परवाने व परवानग्या | २२ |
| | स्वयंमूल्यमापन | ३० |

# ह्या पुस्तिकेसंबंधी

## संचालकांसाठी अभ्यास पुस्तिका संच

१. शेतकरी संस्था : परिचय आणि गरज

२. शेतकरी संस्थेची संस्थात्मक बांधणी व रचना

३. शेतकरी संस्थेचे सभासदत्व

४. शेतकरी संस्थेमधील शासन

५. शेतकरी संस्थेचे व्यवस्थापन

**६. शेतकरी संस्थेच्या कायदेशीरबाबींची पूर्तता**

७. व्यवसाय योजना

८. लेखा आणि वित्त

९. कापणी नंतरचे मूल्य साखळी व्यवस्थापन

१०. विपणन

११. उत्पादकता वृद्धी सेवा

१२. नेतृत्व

**शेतकरी संस्थेच्या कायदेशीरबाबींची पूर्तता** : शेतकरी संस्थेच्या संचालक मंडळाच्या सदस्यांसाठी असलेल्या स्वयंशिक्षण पुस्तिकेच्या मालिकेतील सहाव्या क्रमांकाची पुस्तिका आहे. कायदेविषयक अनुपालन हे संचालक मंडळ सदस्यांचे सर्वात महत्त्वाचे कार्य आहे, हा अभ्यासक्रम या विषयावर भाष्य करते जेणेकरून त्यानुसार संचालक मंडळ सदस्यांची तयारी केली जाईल.

### उद्देश

या पुस्तिकेचा हेतू शेतकरी संस्थेच्या संचालक मंडळ सदस्यांना आवश्यक ज्ञान घेण्यास सक्षम बनविणे आहे जेणेकरून ते प्रभावीपणे आपली भूमिका बजावू शकतील आणि त्यांच्या शेतकरी संस्थांना चैतन्यपूर्ण आणि त्यांच्या सदस्यांसाठी उपयोगी बनण्यांस मदत करेल.

**लक्ष्यगटः** ही पुस्तिका शेतकरी संस्थेच्या संचालक मंडळाच्या सदस्यांसाठी आहे. संचालक मंडळ सदस्यांना त्यांच्या शेतकरी संस्था चालविण्याचा किमान एक वर्षाचा अनुभव असावा.

### शिकण्याचे उद्दिष्ट

* शेतकरी संस्थेसाठी कायदे पालनाची गरज आणि त्यांचे फायदे याबद्दल जागरूक करणे.
* नोंदणीच्या वेगवेगळ्या नियमांची माहिती घेणे
* शेतकरी संस्थेसाठी आवश्यक असणारे विविध प्रकारचे कायदेशीर परवाने / परवानग्यांबद्दल आणि त्यांची गरज याबद्दल जाणून घेणे

## रचना आणि सामग्री

उद्दीष्टांमध्ये दर्शविल्याप्रमाणे, ह्या अभ्यास संचाची सुरुवात कायदेविषयक अनुपालनांची गरज आणि त्यांचे महत्त्व ह्याबद्दल संचालक मंडळ सदस्यांमध्ये आवश्यक संवेदना वाढविण्यापासून होते. मग ते नोंदणीच्या कायद्यांनुसार कायदेशीर अनुपालन आणि शेतकरी संस्थेसाठी आवश्यक विविध कायदेशीर परवाने / परवानग्या हाताळते.

## पुस्तिका कशी वापरावी ?

संचालक मंडळाचे सदस्य हा अभ्यास संच स्वतः वापरु शकतात किंवा बाहेरील व्यक्तींकडून शिकण्याची सोय करू शकतात. या संचांसोबत, योग्य त्या ठिकाणी या अभ्यास संचासंबंधित फलक आहेत जे संचालक मंडळाचे सदस्य, शिक्षणासाठी कामाच्या ठिकाणी प्रदर्शित करू शकतात.

आम्ही अपेक्षा व्यक्त करतो कि आपण या अभ्यासक्रमाच्या शिक्षणाचा आनंद घ्याल आणि आपल्या शेतकरी संस्थेचे अधिक प्रभावी आणि कार्यक्षम पद्धतीने व्यवस्थापन कराल.

# परिभाषा / लघुरूपे

**घटना (ए ओ ए)** : सहकारी संस्थेसाठीच्या नियमावली प्रमाणे शेतकरी उत्पादक कंपनीसाठी आर्टिकल्स ऑफ असोसिएशन (एओए) आहेत. ही घटना कंपनीच्या संचालनाचे नियम स्पष्ट करते आणि कंपनीचे उद्दीष्ट आणि हेतू साध्य करण्याचे मार्ग स्पष्ट करते.

संचालक मंडळाला घटना तयार करावी लागेल आणि त्यांला कंपनी रजिस्ट्रारकडून मान्यता घ्यावी लागेल.घटनेमध्ये दुरूस्ती केल्यास ती दुरुस्ती कंपनी रजिस्ट्रारकडून मंजूर करून घ्यावी लागेल.

**वार्षिक सर्वसाधारण सभा (ए जी एम)** : वार्षिक सर्वसाधारण सभा किंवा सर्वसाधारण सभा ही शेतकरी संस्थेच्या सर्वसाधारण सभासदांची वार्षिक सभा असते.शेतकरी संस्थेचे महत्त्वाचे धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी जसे की लेखापरीक्षा केलेली आर्थिक विवरणपत्रं, वार्षिक योजना, गुंतवणूक आणि वित्तजमा, लेखापरीक्षकांची नियुक्ती, संचालक मंडळाची निवडणूक इ. साठी वार्षिक सर्वसाधारण सभा आयोजित केल्या जातात.

**एपीएमसी परवाना** : कृषी उत्पन्न बाजार समिती (एपीएमसी) परवाना हा एपीएमसी, कृषीपणन विभाग ह्यांच्याकडून दिला जातो.

**एगमार्क** : विपणन व तपासणी संचालनालय, कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालय, भारत सरकारमार्फत कृषी विपणन प्रमाणपत्र दिले जाते.

**बोर्ड / संचालक मंडळ (बीओडी)** : धोरणात्मक निर्णय घेण्याकरिता संचालक मंडळ ही शेतकरी संस्थेची प्रशासकीय समिती आहे. शेतकरी संस्थेच्या संचालक मंडळाची स्थापना सर्वसाधारण सभा अर्थात शेतकरी संस्थेच्या सदस्यांद्वारे निवडलेल्या प्रतिनिधींद्वारे केली जाते.

**नियमावली** : नियमावली ही सहकारी संस्थेचे कार्य सक्षम करण्यासाठीचा नियमांचा एक संच आहे. प्रत्येक सहकारी संस्थेची स्वतःची नियमावली असते आणि सहकारी संस्थेची सर्व कामे त्या नियमावली च्या कक्षेत करावी लागतात.

संचालक मंडळाला घटना तयार करावी लागते आणि त्या नियमावलीला सहकार निबंधकांकडून मंजूरी घ्यावी लागते. नियमावलीत कोणतीही सुधारणा केवळ सर्वसाधारण सभेद्वारेच केली जाऊ शकते आणि सहकार निबंधकांकडून त्याला मंजुरी घ्यावी लागेल.

**बॉडी कॉर्पोरेट** : बॉडी कॉर्पोरेट ही एक औपचारिक, मान्यता प्राप्त संस्था आहे जिला मालमत्ता संपादन, प्रशासन आणि ती बरखास्त करणे, करार करणे, खटला भरणे आणि इतर उद्दीष्टे साध्य करण्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व गोष्टी करण्याचा अधिकार आहे. नोंदणीनंतर शेतकरी संस्था बॉडी कॉर्पोरेट होईल.

**संचालक मंडळाची बैठक** : शेतकरी संस्थेच्या संचालक मंडळाने घेतलेली सभा. शेतकरी संस्थेचे अधिनियम / घटनेनुसार मंडळाच्या बैठकीचे आयोजन, त्याची वारंवारता आणि कार्यपद्धती निश्चित करतात, तथापि, उत्कृष्ट पद्धतीनुसार मंडळ प्रत्येक महिन्यात एकदा तरी सभा घेईल.

**सहकारी संस्था** : सहकारी कायद्यांतर्गत नोंदणीकृत शेतकरी संस्थेला (उदा. महाराष्ट्र सहकारी कायदा १९६०) सहकारी संस्था म्हणतात.

**मुख्य कार्यकारी अधिकारी / व्यवस्थापक / महाव्यवस्थापक** : प्रत्येक शेतकरी संस्थेकडे पूर्ण वेळ मुख्य कार्यकारी अधिकारी (मुख्य कार्यकारी अधिकारी) किंवा हुद्दा कोणताही असो (व्यवस्थापक, महाव्यवस्थापक इ.) असणे आवश्यक आहे. मंडळाची सर्वसाधारण देखरेख, दिशानिर्देश आणि नियंत्रणाखाली मुख्य कार्यकारी अधिकारी शेतकरी संस्थेच्या कामांचे व्यवस्थापन करतील आणि शेतकरी संस्थेच्या कामगिरीसाठी जबाबदार असतील.

**एफपीओ (शेतकरी संस्था)** : शेतकरी संस्था ही एक नोंदणीकृत संस्था आहे जी तिच्या शेतकरी सदस्यांच्या मालकीची आणि नियंत्रणाखाली असते. शेतकरी संस्थेचा उद्देश तिच्या सदस्यांना आवश्यक सेवा देऊन त्यांच्या सामूहिक गरजा भागविणे हा आहे. शेतकरी संस्था शेती आणि संबंधित क्षेत्रात वेगवेगळ्या कामांमध्ये सहभागी होतात. शेतकरी संस्था ही औपचारिक संस्था असल्याने तिचे कार्यालय आणि त्याला पायाभूत सुविधा, कर्मचारी, यंत्रणा असणे आवश्यक आहे आणि संचालक मंडळाने ती संस्था नियंत्रित केली पाहिजे. या पुस्तिकेमध्ये एफपीओला शेतकरी संस्था असा शब्द वापरला आहे.

**एफएसएसएआय** : भारतीय खाद्य सुरक्षा आणि मानक प्राधिकरण (एफएसएसएआय) आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय, भारत सरकारकडून अन्न उत्पादनांसाठी सुरक्षा आणि मानकांचे नियमन करण्यासाठी जारी केलेले प्रमाणपत्र.

**जीएसटी** : वस्तू आणि सेवाकर (जीएसटी) म्हणजे वस्तू आणि सेवांवर एक व्यापक कर जो भारतात एकसारखा असतो.

**एमएसएमई प्रमाणपत्र** : उद्योग विभाग (जिल्हा व्यवस्थापक, जिल्हा औद्योगिक केंद्र) तर्फे दिले जाणारे सूक्ष्म लघु मध्यम उपक्रम प्रमाणपत्र.

**पॅन/PAN** : स्थायी खाते क्रमांक (पॅन) आयकर विभागाने आयकर नियंत्रित करण्यासाठी व्यक्ती आणि नोंदणीकृत संस्थांना दिलेला एक विशिष्ट क्रमांक आहे.

**उत्पादक कंपनी** : कंपनी कायदा २०१३ अंतर्गत नोंदणीकृत शेतकरी संस्थेला उत्पादक कंपनी म्हटले जाते. उत्पादक कंपनी म्हणजेच कंपनी कायदा २०१३ च्या कलम ५८१ ब मध्ये निर्दिष्ट केलेल्या हेतूने आणि निर्दिष्ट उपक्रम करणारी बॉडी कॉर्पोरेट. जी कंपनी म्हणून नोंदणीकृत असणारी संस्था होय.

**सहभागी हमी प्रणाली** : सहभागी हमी प्रणाली (पार्टीसिपेटरी गॅरेन्टी सिस्टीम – पीजीएस); अधिकृत संस्थेतर्फे (कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालय, भारत सरकार) दिले जाणारे तृतीय पक्षाचे प्रमाणपत्र. सहभागी हमी प्रणाली (पीजीएस–इंडिया) ही गुणवत्ता आश्वासित करणारी प्रणाली आहे जी स्थानिक पातळीवर संबंधित आहे, भागधारकांच्या सहभागावर जोर देते.

**अहवाल सादर करणे** : संचालकांच्या अहवालासह प्रत्येक वार्षिक सर्वसाधारण सभेची कार्यवाही, लेखापरीक्षित ताळेबंद आणि नफा–तोटा पत्रक शेतकरी संस्था नोंदणीकृत असलेल्या कायद्यात नमूद केल्याप्रमाणे निबंधकाकडे दाखल केला जाईल.

**टीएएन / TAN** : प्राप्तिकर कपात व जमा करण्याच्या उद्देशाने प्राप्तिकर विभागाकडून करकपात व संग्रह खाते क्रमांक (टीएएन) देखील जारी केला जातो.

# सुरुवात करण्यापूर्वी

ही पुस्तिका शेतकरी संस्थेमधील कायदेशीरबाबींची पूर्तता या विषयाशी निगडित आहे.

या विषयावरील काही मूलभूत प्रश्न खाली दिले आहेत. चला या प्रश्नांची स्वत: उत्तरे देऊया. या चाचणीचा उद्देश हा संबंधित प्रश्नांवरील आपल्या सध्याच्या आकलनाचे मूल्यांकन करणे आणि अशा प्रकारे शेतकरी संस्थेमधील कायदेशीर अनुपालन बद्दल अधिक जाणून घेणे हा यामागील हेतू आहे.

१. शेतकरी संस्थेची कायदे पालन करण्याची गरज काय आहे?

.. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. ..

.. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. ..

.. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. ..

.. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. ..

.. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. ..

.. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. ..

२. शेतकरी संस्थेसाठी कुठले वेगवेगळे परवाने / परवानग्या आवश्यक आहेत?

.. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. ..

.. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. ..

.. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. ..

.. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. ..

.. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. ..

.. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. ..

.. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. ..

१

# कायदेशीर अंमलबजावणी – गरज आणि लाभ

## सत्र उद्देश



**शेतकरी संस्थेसाठी कायदेशीर अंमलबजावणीची गरज आणि त्याचे लाभ याबद्दल जागरूक होणे**

### मुख्य आशय

१. कायदेशीर अंमलबजावणीची गरज
२. कायदेशीर अंमलबजावणीचे फायदे

आधीच्या अभ्यासक्रमामध्ये आपण शेतकरी संस्थेमधील प्रशासनाबद्दल पाहिले. आपण त्या अभ्यासक्रमामध्ये पाहिले आहे की कायदेशीर अंमलबजावणीची खात्री करणे हा शेतकरी संस्थेमधील शासनाचा सर्वात महत्वाचा घटक आहे. या अभ्यासक्रमामध्ये, आपण कायदेशीर अंमलबजावणीचे तपशील बघणार आहोत जे शेतकरी संस्थेच्या संचालक मंडळाद्वारे निश्चित करणे आवश्यक आहेत.



चला याची सुरुवात खाली दिलेल्या एका लहान स्वाध्यायाने करूया.

**स्वाध्याय:** खालील दोन भिन्न शेतकरी उत्पादक कंपन्यांचा सविस्तर अभ्यास करूया. आपण त्यांचा अभ्यास करुन त्यांच्या होणाऱ्या परिणामांबद्दल चर्चा करण्याची गरज आहे.

### शेतकरी उत्पादक कंपनी १:

या शेतकरी उत्पादक कंपनीमध्ये दरवर्षी वार्षिक सर्वसाधारण सभा घेण्यात येते जेथे इतर व्यवहारांव्यतिरिक्त रिक्त पदांसाठी संचालकांची निवड केली जाते. मागील वर्षात, घटनेमध्ये आवश्यक दुरुस्ती आणि दीर्घमुदतीच्या योजनांच्या मंजुरीसाठी त्यांनी एक विशेष सर्वसाधारण सभा देखील आयोजित केली होती.

मंडळाच्या बैठका दर महिन्यात ठरलेल्या ५ तारखेला घेतल्या जातात. मंडळाने मुख्य कार्यकारी अधिकारी देखील नेमला आहे. वित्तीय वर्ष संपल्यानंतर लवकरच वैधानिक लेखापरीक्षण केले जाते. वार्षिक परतावा, जीएसटी परतावा भरणे आणि सर्व वैधानिक नोंदवह्यांची देखभाल वेळेत केली जाते.

### शेतकरी उत्पादक कंपनी २:

या शेतकरी उत्पादक कंपनीमध्ये संचालक मंडळाच्या बैठका घेतल्या जातात पण नियमितपणे घेतल्या जात नाहीत. जरी गेल्या वर्षी वार्षिक सर्वसाधारण सभा झाली असली तरी ही ते आरओसी (कंपनीचे प्रबंधक) यांच्याकडे वार्षिक विवरण पत्रे भरण्यास विसरले. वार्षिक सर्वसाधारण सभेच्या अगोदर वैधानिक लेखापरीक्षण देखील घाईघाईने केली जाते. वैधानिक नोंदवह्या अद्ययावत नाहीत. त्यांच्याकडे एका तिमाहीत कोणतेही व्यावसायिक व्यवहार झाले नाहीत आणि त्यांना वाटले की त्या तिमाहीसाठी त्यांना जीएसटी विवरण पत्र दाखल करण्याची आवश्यकता नाही.

शेतकरी संस्था परिचय आणि गरज अभ्यास पुस्तिकेमध्ये चर्चा केल्यानुसार, शेतकरी संस्था नोंदणीकृत संस्था आणि बॉडी कॉर्पोरेट्स आहेत. याचा अर्थ असा आहे की शेतकरी संस्थेचे नियमन देशाच्या कायद्याद्वारे – ज्या कायद्यात नोंदणीकृत आहेत तसेच शेतकरी संस्थेच्या कामकाजाशी संबंधित इतर कायद्यांद्वारे देखील केले जाते. अशाप्रकारे, शेतकरी संस्था ही पूर्णपणे कायदेशीरदृष्ट्या नियमित संस्था असणं हे अत्यंत महत्वाचे आहे आणि हे सुनिश्चित करणे ही मंडळाची प्राथमिक जबाबदारी आहे.



## कायदेशीररित्या सुसंगत असण्याचे फायदे

* कोणत्याही कायदेशीर गरजेसाठी संरक्षित रहा – उदाहरणार्थ, साठवणुकीवर दक्षता छापे, एखाद्या प्रतिस्पर्धकाकडून कोणतेही कायदेशीर प्रकरण, खरेदीदारास पैसे न देणे इ.
* शेतकरी संस्थेसाठी बळकट संस्थात्मक यंत्रणेचा विकास – जसे की लेखापालन, शासन, देखरेख इ.
* आर्थिक विवरणपत्रे, कायदेशीर कागदपत्रांची पूर्तता करून शेतकरी संस्थेसाठी निधी गोळा करणे.
* करार करू शकतो आणि व्यवहार करू शकतो – जसे कि खरेदीदाराबरोबर उत्पादनांच्या विपणनासाठी.
* पारदर्शकता आणि जबाबदारीमध्ये योगदान

कायदेशीरदृष्ट्या नियमित राहण्याची आवश्यकता आणि त्यांचे फायदे याबद्दल स्पष्टीकरण दिल्यानंतर, कोणते कायदेशीर अनुपालन शेतकरी संस्थेला आवश्यक आहे हे आता पाहूया.



# २

# नोंदणी कायद्यान्वये कायदेशीरबाबींचे अनुपालन

## सत्र उद्देश



**नोंदणी कायद्याच्या वेगवेगळ्या अनुपालनांसह परिचित होण्यासाठी**

## मुख्य आशय

१. शेतकरी संस्थेसाठी कायदेशीर अनुपालन

## नोंदणी कायद्यान्वये कायदेशीरबाबींचे अनुपालन

या सत्रात, कंपनी कायदा २०१३ अंतर्गत उत्पादक कंपनी म्हणून नोंदणी झालेल्या शेतकरी संस्थेद्वारे कोणकोणत्या कायदेशीरबाबींचे अनुपालनाचे पालन करायचे ते पाहूया. सर्व आवश्यक कायदेशीरबाबींचे अनुपालन निश्चित वेळेत करणे आवश्यक आहे अन्यथा दंड होऊ शकेल.



## तक्ता: उत्पादक कंपनीच्या कायदेशीरबाबींचे अनुपालनांचे कॅलेंडर

| क्र | कार्य | तपशील | एप्रिल | मे | जून | जुलै | ऑगस्ट | सप्टेंबर | ऑक्टोबर | नोव्हेंबर | डिसेंबर | जानेवारी | फेब्रुवारी | मार्च |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | संचालक मंडळाची बैठक  | वर्षामध्ये किमान ४ (तिमाहीत एक) | ■ | | | ■ | | | ■ | | | ■ | | |
| २. | वैधानिक लेखापरीक्षा  | प्रत्येक आर्थिक वर्षासाठी | ■ | | | | | | | | | | | |
| ३. | विशेष लेखापरीक्षण  | कंपनी कायदा प्रबंधकाच्या मागणीनुसार | ■ | | | | | | | | | | | |
| ४. | वार्षिक सर्वसाधारण सभा  | वर्षातून एकदा, आर्थिक वर्ष संपल्यानंतर सहा महिन्यांच्या आत | | | | | | ■ | | | | | | |
| ५. | संचालक मंडळाच्या सदस्यांची निवडणूक  | दरवर्षी एकतृतीयांश | | | | | | ■ | | | | | | |

| क्र | कार्य | तपशील | एप्रिल | मे | जून | जुलै | ऑगस्ट | सप्टेंबर | ऑक्टोबर | नोव्हेंबर | डिसेंबर | जानेवारी | फेब्रुवारी | मार्च |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६. | कंपनी नियंत्रकाकडे विवरण पत्र दाखल करणे  | वार्षिक सर्वसाधारण सभेच्या ३० दिवसांच्या आत | | | | | | | | | | | | |
| ७. | राखीव निधी  | वर्षातून एकदा | | | | | | | | | | | | |
| ८. | लेखापरीक्षकांची नेमणूक  | वार्षिक सर्वसाधारण सभेद्वारे | | | | | | | | | | | | |
| ९. | जीएसटी विवरणपत्र भरणे  | १२ (महिन्यातून एकदा) | | | | | | | | | | | | |

| क्र | कार्य | तपशील | एप्रिल | मे | जून | जुलै | ऑगस्ट | सप्टेंबर | ऑक्टोबर | नोव्हेंबर | डिसेंबर | जानेवारी | फेब्रुवारी | मार्च |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १०. | विशेष सर्वसाधारण सभा  | जसं आणि जेव्हा आवश्यक असेल तेव्हा | | | | | | | | | | | | |
| ११. | वैधानिक नोंदवह्यांची देखभाल  | नेहमीच | | | | | | | | | | | | |

**स्वाध्याय:** आता, आपली शेतकरी संस्थेवरील कायद्यानुसार सर्व कायदेशीरबाबींचे अनुपालनांचे पालन करत आहे की नाही याचे आपण मूल्यांकन करणे आवश्यक आहे. तसे नसल्यास, वेळेत सर्व अनुपालन निश्चित करण्यासाठी कोणते कृती कार्यक्रम असू शकतात?

# गुन्हे आणि दंड

शेतकरी उत्पादक कंपनीच्या वेगवेगळ्या गुन्ह्यांसाठी, खाली नमूद केल्यानुसार कंपनी ॲक्टमध्ये दंड निर्दिष्ट केला आहे.

**तक्ता १ : गुन्हे आणि दंड**

| क्र. | गुन्ह्याचे स्वरूप | शिक्षेचे प्रमाण |
|---|---|---|
| १ | उत्पादक कंपनीच्या उद्योगाच्या विरोधात एखादा सदस्य हितसंबंध निर्माण करतो | तो सभासद राहत नाही आणि अधिनियमांनुसार त्याला काढले जाईल |
| २ | कोणताही संचालक या कायद्यातील किंवा इतर कोणत्याही कायद्यातील तरतुदींचे उल्लंघन करून मतदान करतो, मंजूर करतो किंवा कार्य करतो | संचालकाने, अश्याप्रकारच्या मतदानाने किंवा कृतीने, कंपनीला झालेला तोटा, नुकसान किंवा नफा भरून द्यायला हवे. |
| ३ | कंपनीच्या कार्यांसंबंधी माहिती एखाद्या सदस्यास किंवा अधिकृत व्यक्तीस पुरविण्यात संचालकाचे अपयश | मागील वर्षातल्या कंपनीच्या उलाढालीच्या ५% पर्यंत दंड |
| ४ | खाते, कागदपत्रे किंवा मालमत्ता यांची पुस्तके उत्पादक कंपनीकडे सोपविण्यात अपयश | एक लाख रुपयांपर्यंत दंड आणि कसूर चालू असल्यास प्रत्येक दिवसासाठी अतिरिक्त रु. १०,००० / – |
| ५ | वार्षिक सर्वसाधारण सभा किंवा सर्वसाधारण सभा बोलवण्यात अपयश | एक लाख रुपयांपर्यंत दंड आणि कसूर चालू असल्यास प्रत्येक दिवसासाठी अतिरिक्त रु. १०,००० / – |
| ६ | गुंतवणूकीच्या एका वर्षाच्या आत व्यवसाय सुरू करण्यात उत्पादक कंपनी अयशस्वी | वस्तुस्थितीची चौकशी केल्यानंतर आणि संचालकांना बोलण्याची वाजवी संधी दिल्यानंतर कंपनी कायदा प्रबंधकांना कंपनीचे नाव काढून टाकण्याचा अधिकार |

| क्र. | गुन्ह्याचे स्वरूप | शिक्षेचे प्रमाण |
|---|---|---|
| ७ | उत्पादक कंपनी सदस्यांबरोबर व्यावसायिक व्यवहार करणे थांबवते | |
| ८ | उत्पादक कंपनी कायद्यानुसार निर्दिष्ट केलेले उद्दीष्ट पाळत नाही | |
| ९ | उत्पादक कंपनी परस्पर सहाय्याची कोणतीही तत्वे पाळत नाही | |

कंपनी अधिनियम नियमांच्या आधारे अनुपालन व दंडात्मक माहितीचा तपशील वेळोवेळी बदलू शकतो. म्हणून, वेळोवेळी सर्व बाबींच्या अनुपालनांची खात्री करण्यासाठी संचालक मंडळाच्या सदस्यांनी नोंदणीकृत कंपनी सेक्रेटरीची सेवा घ्यावी.



३

# कायदेशीर परवाने व परवानग्या

## सत्र उद्देश



**शेतकरी संस्थेसाठी लागणारे विविध प्रकारच्या कायदेशीर परवाने / परवानग्या आणि ते मिळविण्याच्या गरजेसंबंधी जाणून घेणे**

## मुख्य आशय

१. शेतकरी संस्थेसाठी कायदेशीर परवाने / परवानग्या
२. शेतकरी संस्थेमध्ये सांभाळण्यासाठी वैधानिक नोंदवह्या

### कायदेशीर परवाने /परवानग्या

नोंदणीकृत कायद्यांतर्गत वेगवेगळ्या परवानग्या व्यतिरिक्त, शेतकरी संस्थांना त्यांच्या व्यवसायासाठी आवश्यक परवाने / परवानग्या असणे आवश्यक आहे. ते खालील तक्त्यात सूचीबद्ध आहेत.



## तक्ता: उत्पादक कंपनीच्या कायदेशीरबाबींचे अनुपालनांचे कॅलेंडर

| व्यवसाय | क्रिया | आवश्यक परवाने / परवानग्या | जारी करणारा अधिकारी /करणारी अधिकृत संस्था |
|---|---|---|---|
| **निविष्ठा व्यवसाय**   | बियाणे | बियाणे उत्पादन व विक्री परवाना; बियाणे प्रमाणपत्र परवाना | कृषी विभाग; राज्य बीज प्रमाणन केंद्र |
| | विक्री केंद्र | निविष्ठा (खते, कीटकनाशके) विक्रेता; दुकाने आणि आस्थापने | कृषी विभाग; दुकाने व आस्थापना कायदा, कामगार विभाग |
| **खरेदी, वखार आणि विक्री**   | खरेदी | कृषी उत्पन्न बाजार समिती (एपीएमसी) परवाना | एपीएमसी, कृषीपणन विभाग |
| | गुणवत्ता | कृषी विपणन (एगमार्क) प्रमाणपत्र | विपणन व तपासणी संचालनालय, कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालय, भारत सरकार |
| | वखार | वखार कायद्याची अंमलबजावणी; अन्नधान्यपरवाना | वखार विकास व नियामक प्राधिकरण, राज्य वखार महामंडळ; नागरी पुरवठा महामंडळ |
| | विक्री | वजने आणि परिमाणे | नागरी पुरवठा महामंडळ |

| व्यवसाय | क्रिया | आवश्यक परवाने / परवानग्या | जारी करणारा अधिकारी /करणारी अधिकृत संस्था |
|---|---|---|---|
| **प्रक्रिया**  | प्रक्रिया केलेले अन्नपदार्थ | भारतीय खाद्य सुरक्षा आणि मानक प्राधिकरण (एफएसएसएआय) प्रमाणपत्र | आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, भारत सरकार |
| | प्रदूषण उद्योग, कारखाना, लघु मध्यम उपक्रम (एम.एस.एम.ई) | प्रदूषण नियंत्रण; कारखाना परवाना; एमएसएमई प्रमाणपत्र | उद्योगविभाग (जिल्हा व्यवस्थापक, जिल्हा औद्योगिक केंद्र) |
| | | पाणी परवानगी | ग्रामपंचायत |
| | | वीज परवानगी | वीज विभाग |
| | | अग्निशमन केंद्र परवानगी | अग्निशमन केंद्र |
| **व्यवसाय / सेवा**  | वस्तूंवर / सेवांवर आकारला गेलेला कर | वस्तू व सेवाकर (जीएसटी) | केंद्रीय अप्रत्यक्ष कर आणि सीमाशुल्क मंडळ, अर्थ मंत्रालय, भारत सरकार |
| | आयकर | कायम खाते क्रमांक (पॅन); कर कपात आणि संग्रह खातेक्रमांक (टीएएन) | आयकर विभाग |
| **उत्पादन**  | सेंद्रिय उत्पादने | सहभागी हमी प्रणाली तृतीय पक्ष प्रमाणपत्र | अधिकृत संस्था (कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालय, भारत सरकार) |

## Sample Licences and issuing Authorities

### 1. Seed Certification Licence


BK Tag No 454954

PADDY

Kind: IR-64

Variety: Apr-05-01-526(A)-5670

Lot No.:

"Use of the seed after expiry of the validity period by any person is entirely at his risk and the holder of the certificate shall not be responsible for any damage to the buyer of seed. No one should purchase the seed if seal of the certification tag has been tampered with".

Name and Full Address of Certified seed Producer: M/s. Vasantha Seeds, Settipalem, (M) Vemulapally, Nalgonda (Dist.)

APSSCA HYDERABAD

CERTIFIED SEED

Class of Seed:

Certificate No.: 106420

Date of Issue of Certificate: 13-06-05

Date of Test: 06-06-05

Certificate Valid up to 05-03-06

(Provided seed is stored under cool and dry environment)

Seed Certification Officer (Name and Place)

Validity of Certificate further extended up to

Seed Certification Officer (Name and Place)

**2. Organic Certification**

PGS-INDIA ORGANIC

**3. MSME Authority**

सत्यमेव जयते

MSME

MICRO, SMALL & MEDIUM ENTERPRISES

सूक्ष्म, लघु एवं मध्यम उद्यम

**4. Warehouse Authority**

WDRA

Warehousing Development & Regulatory Authority

**5. Food Products Authority**

fssai

FOOD SAFETY AND STANDARDS AUTHORITY OF INDIA

*Inspiring Trust, Assuring Safe & Nutritious Food*

Ministry of Health and Family Welfare, Government of India

**6. Agriculture Produce Quality**

भारत सरकार

AGMARK एग मार्क

GOVERNMENT OF INDIA

### 7. Goods Service Tax




### 8. FPO PAN Card



आयकर विभाग
INCOME TAX DEPARTMENT

भारत सरकार
GOVT. OF INDIA

स्थायी लेखा संख्या कार्ड
Permanent Account Number Card

AAEAJ7676E

नाम / Name
JAI KISHAN AGRICULTURE PRODUCER MUTUALLY AIDED COOPERATIVE SOCIETY

31012019

निगमन/गठन की तारीख
Date of Incorporation/Formation
01/10/2018

### 9. FPO Fertilizer Licence

FORM A-2
ACKNOWLEDGEMENT
(See clause 8(3))

NEW

Authorization Letter Number : CTR/36/ADA/FR/2018/23839
Date of issue : 28/12/2018
Valid up to : 27/12/2021

1. Received from M/s. RAMASAMUDRAM MANDAL AGRICULTURAL PRODUCERS MUTUALLY AIDED CO-OPERATIVE FEDERATION LTD., RAMASAMUDRAM(V), RAMASAMUDRAM(M), PUNGANUR(DIV), CHITTOOR (DISTRICT).a complete memorandum of intimation along with Form "O", fee of Rs.2500/- by challan bearing No(s).21022853442018, Dt(s):14/08/2018.

2. This acknowledgement shall be deemed to be the letter of authorization entitling the applicant to carry on the business as applied for a period of 3 years from the date of issue of this Memo of acknowledgement unless suspended or revoked by the competent authority.

Date : 28/12/2018
Place : Punganur

Signature of Notified Authority

LETTER OF AUTHORIZATION TO CARRY ON THE BUSINESS OF SELLING OF FERTILIZERS AS A RETAIL DEALER IN GOVERNMENT OF ANDHRA PRADESH

M/s.RAMASAMUDRAM MANDAL AGRICULTURAL PRODUCERS MUTUALLY AIDED CO-OPERATIVE FEDERATION LTD., RAMASAMUDRAM(V), RAMASAMUDRAM(M), PUNGANUR(DIV), CHITTOOR(DISTRICT), is here by granted letter of authorization to carry on the business of selling fertilizers/bio fertilizers/Organic fertilizers in retail at the place specified below in the state of Andhra Pradesh subject to the terms and conditions specified below and to the provision of the Fertilizer (Control) Order,1985.

DESCRIPTION OF THE PLACE AND TYPE OF BUSINESS

| Place of business and personal responsible | Location of sale depot | Location of Godowns attached to sale depot | Type of Fertilizers | Source of Supply |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| M/s.RAMASAMUDRAM MANDAL AGRICULTURAL PRODUCERS MUTUALLY AIDED CO-OPERATIVE FEDERATION LTD., 6-57, Bajaar Street, Ramasamudram, Ramasamudram, Punganur, Chittoor.<br><br>Person Responsible List Enclosed | 6-57, Bajaar Street, Ramasamudram, Ramasamudram, Punganur, Chittoor.<br><br>(Godown also included) | Nil | List Enclosed | List Enclosed |

Seal :

Date : 28/12/2018

Place : Punganur

Signature of Notified Authority

## 10. FPO- GST Registration Certificate

सत्यमेव जयते

**Government of India**

**Form GST REG-06**

***[See Rule 10(1)]***

**Registration Certificate**

**Registration Number :** 37AAALR1612H1Z7

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 1. | **Legal Name** | RMS MANDAL AGRICULTURE PRODUCERS MUTUALLY | | | |
| 2. | **Trade Name, if any** | RMS MANDAL AGRICULTURE PRODUCERS MUTUALLY | | | |
| 3. | **Constitution of Business** | Local Authority | | | |
| 4. | **Address of Principal Place of Business** | 6-57, BAJAR STREET, RAMASAMUDRAM, Chittoor, Andhra Pradesh, 517325 | | | |
| 5. | **Date of Liability** | | | | |
| 6. | **Period of Validity** | From | 26/07/2018 | To | NA |
| 7. | **Type of Registration** | Regular | | | |
| 8. | **Particulars of Approving Authority** | | | | |

| | |
|---|---|
| Signature | Validity unknown<br>Digitally signed by DS GOODS AND SERVICES TAX NETWORK 1<br>Date: 2018.07.26 00:19:34 IST |
| Name | |
| Designation | |
| Jurisdictional Office | |
| 9. Date of issue of Certificate | 26/07/2018 |

Note: The registration certificate is required to be prominently displayed at all places of business in the State.

**स्वाध्याय:** विविध परवाने / परवानग्यांच्या आवश्यकतेनुसार आपल्या शेतकरी संस्थेचे मूल्यांकन करूया.

| क्र | तपशिल | आवश्यक परवाना / परवानगी | प्राप्त आहेत (हो/ नाही) | परवाना अदा केला जातो / नूतनीकरण केले जाते (हो/ नाही) |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

## वैधानिक नोंदवह्या

कंपनी कायदा २०१३ नुसार प्रत्येक उत्पादक कंपनीला खालील वैधानिक नोंदवह्या ठेवाव्या लागतात.

### उत्पादक कंपनीमध्ये ठेवल्या जाणाऱ्या वैधानिक नोंदवह्या

- शुल्काची नोंदवही
- सदस्यांची नोंदवही
- संचालकांची आणि त्यांच्या समभागांच्या तपशीलांची नोंदवही
- वार्षिक विवरण पत्रांच्या प्रती
- मंडळाच्या बैठकीची व मंडळाच्या समितीच्या बैठकीची कार्यवृत्त पुस्तिका
- सर्वसाधारण सभेची कार्यवृत्त पुस्तिका
- जाहीर केलेला लाभांश व उर्वरित बाकी यांची नोंदवही
- योग्य खाती पुस्तके
- कंपनीच्या घेतलेल्या कर्जाची आणि गुंतवणूकींची नोंदवही

# स्वयंमूल्यमापन

कृपया लक्षात ठेवा कि अभ्यास पुस्तिकेच्या सुरूवातीस आपल्याकडे पायाभूत / प्राथमिक माहिती होती ज्यामध्ये आपण शेतकरी संस्थेमधील कायदेशीरबाबींची पूर्तता याबद्दल काही मूलभूत प्रश्नांची उत्तरे दिली होती.

आता अंतिम टप्प्यात येत असतांना, वरील पुस्तिकेचा अभ्यास केल्यानंतर जास्तीत जास्त समजून घेण्याबाबत स्वत:चे मूल्यांकन करण्यासाठी समारोपाची ओळ दिली आहे.

या पुस्तिकेवरील आपल्या शिक्षणावर आधारित आणखी काही प्रश्नांची उत्तरे देऊया.

**१. कोणत्याही व्यवसायासाठी शेतकरी संस्थेसाठी कोणते अनिवार्य परवाने / परवानग्या आवश्यक आहेत?**

..............................................................................................

..............................................................................................

..............................................................................................

..............................................................................................

**२. कायदेशीर अनुपालनाची पूर्तता न केल्याचे काय परिणाम होतील?**

..............................................................................................

..............................................................................................

..............................................................................................

..............................................................................................

**३. उत्पादक कंपनीसाठी कायदेशीरबाबींमध्ये वेगवेगळे संभाव्य गुन्हे कोणते आहेत?**

..............................................................................................

..............................................................................................

..............................................................................................

..............................................................................................

# पुस्तिकेतील प्रमुख कृती बिंदू

## शेतकरी संस्थेच्या कायदेशीरबाबींची पूर्तता

कायदेशीरबाबींची पूर्तता या पुस्तिकेमधून आपल्या शेतकरी संस्थेसाठी प्रमुख कृती बिंदू काय असू शकतात याची यादी करूया.

.......................................................

.......................................................

.......................................................

.......................................................

.......................................................

.......................................................

.......................................................

.......................................................

.......................................................

.......................................................

.......................................................

.......................................................

.......................................................

.......................................................

.......................................................

.......................................................

## टिपणे

# सहकारी मूल्ये



स्व-मदत




स्वयं-जबाबदारी



लोकशाही




समभाग



समानता




एकता




## एपीएमएएसबाबत

एपीएमएएस ही एक ना नफा ना तोटा या तत्वावर चालणारी राष्ट्रीय स्तरावरील स्त्रोत संस्था आहे महिला बचत गट (एसएचजी) आणि त्यांच्या संघटना, सहकारी संस्था, शेतकरी संस्था (एफपीओ) आणि इतर समुदाय आधारित संस्था (सीबीओ) ज्यांचा आत्मनिर्भर, परस्पर सहकार्य, स्वयं शिस्त अशा मार्गदर्शक मुल्यांवर ज्यांचा विश्वास आहे अशांच्या सबलीकरणासाठी एपीएमएएस कार्यरत आहे.





## सुधर्मा - शेतकरी संस्थेच्या कायदेशीरबाबींची पूर्तता

शेतकरी संस्थांना प्रोत्साहन आणि साहाय्य करणाऱ्या संस्थांना शाश्वत उद्योग विकसित आणि मार्गदर्शन करण्यासाठी एपीएमएएसने शेतकरी संस्था साहाय्य केंद्र स्थापन केले आहे. या संस्था बळकट करण्यासाठी लागणारी ध्येय-धोरणे, प्रशासन-व्यवस्थापन क्षमता वाढवणे यासारख्या विविध सेवा उपलब्ध करून देत आहे. त्याचबरोबरही संस्था शेतकरी संस्थांना व्यवसाय नियोजन, आर्थिक दुवे, विपणन विकसित करण्यासाठी तांत्रिक साहाय्य उपलब्ध करून देते.

साहाय्य

DGRV

द्वारा प्रकाशित

BAIF

apmas